प्रकरण पहिले

# प्रास्ताविक आणि भूमिका

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

प्रकरण पहिले

# प्रास्ताविक आणि भूमिका

**प्रास्ताविक आणि भूमिका :**

'' 'यमुना पर्यटन' आणि 'मोचनगड' या कादंबऱ्यांचे योगदान हा विषय एम्.फिल्. प्रबंधिकेसाठी निवडण्यात आला तो मार्गदर्शक डॉ.कन्हैय्या कुंदप यांच्याशी सल्ला मसलत करूनच.

बी.ए.आणि एम्.ए.चा अभ्यास करताना कथा, कादंबऱ्या, नाटक वाचण्याची आवड होती. एम्.ए.च्या 'आधुनिक मराठी वाङ्मयाच्या इतिहासातील भाषांतर युगातील कथा, कादंबरी व नाटक यापैकी कोणत्यातरी वाङ्मय प्रकाराचा आपण अभ्यास करावा असे मला मनोमन वाटत होते. त्यादृष्टीने कथा, कादंबरी, नाटक हे सर्व वाङ्मय प्रकारांचे वाचनही केले. परंतु या सर्व वाङ्मयात मला 'कादंबरी' हाच वाङ्मय प्रकार निवडावा असे वाटले. कारण वाङ्मयाच्या इतर प्रकाराशी कादंबरी या वाङ्मय प्रकाराची तुलना केली तर कादंबरी ही कित्येक बाबतीत श्रेष्ठ आहे असे आढळून येईल. काव्य कवीच्या तोंडून ऐकावयास मिळाले तर काव्याचा खरा रसास्वाद सुलभतेने प्राप्त होतो. निदान गायनाकडे नैसर्गिक प्रवृत्ती व रसग्रहन करण्याची पात्रता तरी असलीच पाहिजे. काव्याचे खरे सौंदर्य व मर्म निवडक लोकांसच समजते. भाषांतरात काव्याचा अल्पांशही उरत नाही व याच कारणास्तव परकीय भाषेतील काव्याविषयी चर्चा पुष्कळदा उथळ अशी असते. काव्यांस गणमात्रांचे बंधन असते, ते निराळेच कादंबरीस ही बंधने नाहीत व भाषांतरातही तिचे सौंदर्य किंवा मनोवेधकता नष्ट होण्याचा संभव कमीच. साधारण लोकांसही कादंबरीचा आनंद लुटता येतो, त्यासाठी समीक्षाशास्त्राचा जाणकार असण्याची आवश्यकता नसते. नाटक व कादंबरी या दोन विभागात बरेच साम्य आहे. तथापि रंगभूमीवर नाटकाचे मर्म जितके खुलते तितके ते घरी बसून वाचताना कळत नाही. चांगले नटच नाटकर्त्याचे हृद्‌गत योग्य तऱ्हेने व्यक्त करु शकतात. नाटककाराची प्रतिमा याप्रमाणे योग्य व लायक नटांच्या अभावी लंगडी पडते, पण कादंबरीकाराच्या प्रतिभेस अशी कोणत्याही प्रकारची मर्यादा नाही. निबंधाचे वाचक कादंबऱ्यांच्या वाचकापेक्षा फारच थोडे असतात. या सर्व दृष्टीने विचार करता साहित्यसेवकांस आपले जीवितावरचे भाष्य प्रगट करण्यास कादंबरी हेच सर्वोत्कृष्ट माध्यम होय यात शंका नाही. व वाचकांनाही ते समजून घेण्यास काहीच अडचण नाही.

कादंबरी या वाङ्मय प्रकाराचा अभ्यास करताना सामाजिक व ऐतिहासिक कादंबऱ्याचा अभ्यास करावा असे वाटले. त्यासाठी सामाजिक कादंबऱ्या म्हणून 'यमुना पर्यटन' या पहिल्या सामाजिक कादंबरीपासून सुरुवात केली. रहाळकरांची 'नारायणराव आणि गोवरी' या महाराष्ट्रातील मध्यम वर्गाचे वास्तवदर्शी चित्रण करणाऱ्या कादंबरीला पाहिले त्यानंतर विनायक कोडदेव ओक यांची 'शिरस्तेदार' ही कादंबरी यात लहानशा स्वतंत्र कादंबरीत लाच खाण्यापासून होणाऱ्या दुष्परिणामांचे अत्यंत वेधक वर्णन आहे. यानंतर 'यशवंतराव आत्मचरित्र, वेणू, रंगराव याही काही वस्तूनिदर्शक कादंबऱ्या आहेत. यानंतर हरिभाऊ आपटे यांनीही सामाजिक कादंबऱ्या लिहिल्या आहेत. स्वतंत्र सामाजिक कादंबऱ्यांचे जनक म्हणून नावारुपास चढलेल्या हरिभाऊंनी कादंबरी लेखनाचा पहिला धडा इंग्रजी कादंबरीचे भाषांतर करूनच गिरवला. त्यांनी रेनॉल्डसच्या Mysteries of lod London या कादंबरीचे 'मधली स्थिती या नावाने भाषांतर करण्यास सुरुवात केली. पाश्चात्य शिक्षण म्हणजे पाश्चात्य व्यसनांचे अनुसरण असे समजण्याचा काही आंग्लाशिक्षितांची वर्तणूक कशी बेताल आणि उच्चशृंखल होती, व्यसनाधीनता तत्कालीन समाजातील स्त्रियांचा कसा अमानुष छळ करीत होती याचे अत्यंत वेधक चित्र या कादंबरीत हरिभाऊंनी रेखाटले आहे. गणपतराव (१८८७-८८ अपूर्ण) पण लक्षात कोण घेतो? (१८९०-९३) यशवंतराव खरे, (१८९२-९५) मी, (१८९३-९५) जग हे असे आहे. (१८९७-९९) भयंकर दिव्य (१९०१-०३) आजच (१९०४-०६ अपूर्ण) मायेचा बाजार (१९१०-१२) आणि कर्मयोग (१९१३-१७ अपूर्ण) अशा एकूण दहा सामाजिक कादंबऱ्या लिहिल्या. हरिभाऊंच्या या सामाजिक कादंबऱ्यातील 'मधली स्थिती'तील दुर्गेच्या, 'पण लक्षात कोण घेतो? मधील यमुनेच्या किंवा 'मायेचा बाजार' मधील पद्मेच्या छळाच्या करून कथा वाचून वाचणाऱ्याच्या अंत:करणाला पाझर फुटणार नाही. असा 'एक तरी सहृदय वाचक सापडणे शक्य आहे का?

आपट्यांच्या नंतर नाथमाधवांनी काही सामाजिक कादंबऱ्या लिहिल्या स्त्रीशिक्षणाला गृहाशिक्षणाची जोड असणे कसे आवश्यक आहे हे 'डॉक्टर' कादंबरीत दाखविले आहे. नामदेव समाजातील एका सुशील कुमारिकेला आपल्या इच्छविरुद्ध ख्रिस्ती धर्माचा कसा स्वीकार करावा लागला याचे चित्र 'विमेलची गृहदशा' या कादंबरीत आपल्या येथील पाश्चात्य डॉक्टर व पारिचारिका हे हिंदी डॉक्टरापेक्षा व परिचारिकांपेक्षा आपल्या कामात कसे अधिक वाकबगार आणि तत्पर असतात हे दाखविले आहे. 'सापत्नभाव' या नावातच त्या कादंबरीचे कथानक सूचीत झाले आहे.

'स्वयंसेवकात' दारु पिण्याचे दुष्परिणाम चित्रित केले आहेत असे असले तरी नाथमाधव हे सर्वसामान्य मराठी वाचकांना परिचित आहेत ते सामाजिक कादंबऱ्याचे लेखक म्हणून नव्हे तर शिवकालिन इतिहासावरील कादंबऱ्याचे लेखक म्हणून.

१८८५ ते १९२० या कालखंडाच्या अखेरी-अखेरीस लिहायला सुरुवात करून जवळजवळ आजतागायत लेखन करीत असलेले नारायण हरि आपटे हे अत्यंत सत्वशील वृत्तीचे बहुलप्रसु लेखक आहेत. त्यांनी अनेक सामाजिक कादंबऱ्या लिहिलेल्या असून त्यापैकी 'वैभवाच्या कोंदणात', 'भाग्यश्री', 'याला कारण शिक्षण', 'पहाटेपूर्वीचा काळोख' आणि 'सुखाचा मूलमंत्र' या विशेष उल्लेखनीय आहेत. ''कोणतीही कादंबरी लिहिताना सदभिरुचीचे उल्लंघन करावयाचे नाही आणि समाजाच्या नीतीचा व शीलाचा दर्जा वाढेल अशा गोष्टींचे वर्णन करावयाचे'' असा त्यांनी निश्चय केलेला असल्यामुळे त्यांच्या साऱ्याच कादंबऱ्या बोधप्रधान स्वरुपाच्या झोलेल्या आहेत.

या सर्व सामाजिक कादंबऱ्याचा आढावा घेतल्यानंतर माझ्या मनात विचार आला की या सर्व सामाजिक कादंबऱ्यांची इमारत ज्या पायावर उभी राहिली आहे अशा पायाभूत असणाऱ्या पहिल्या सामाजिक कादंबरीची म्हणजेच बाबा पद्मनजींच्या ''यमुनापर्यटन''ची निवड का करु नये म्हणून मी प्रबंधिकेसाठी ही कादंबरी निवडली. सामाजिक काबंदरीबरोबरच मला ऐतिहासिक कादंबरीचाही अभ्यास करावा असे वाटले. व म्हणून 'मी रा.भि.गुंजीकर यांच्या शिवकालाच्या पार्श्वभूमीवर लिहिलेल्या 'मोचनगड' या पायाभूत कादंबरीची निवड केली.

'मोचनगड' च्या मजबूत पायावरच पुढील ऐतिहासिक कादंबऱ्याची इमारत उभी आहे. अशा काही कादंबऱ्यांचाही आढावा आपणाला येथे घ्यावयाचा आहे. 'मोचनगड' नंतर नागेश विनायक बापट यांनी 'संभाजी' 'चितुरगडचा वेढा', 'पानिपतची मोहिम' या ऐतिहासिक कादंबऱ्या लिहिल्या. विष्णू जनार्दन पटवर्धन यांनी सत्तावन सालच्या बंडावर 'हंत्रीरराव व पुतळाबाई' (१८८५) आणि पहिल्या बाजीरावाच्या काळावर 'जुना वाडा' (१८८९) या दोन कादंबऱ्या लिहिल्या. मोचनगडाप्रमाणेच चिं.मो.आपटे यांची 'पुतळाबाई' ही शिवकाळावर आधारलेली कादंबरी लिहिण्यात आली.

यानंतर हरिभाऊ आपटे यांनीही ऐतिहासिक कादंबऱ्या लिहिल्या आहेत. म्हैसूरचा वाघ (१८९०-९१), उष:काल (१८९५-९७), केवळ स्वराज्यासाठी (१९९८-९९), रुपनगरची राजकन्या

(१९००-०२), चंद्रगुप्त (१९०२-०४), गड आला पण सिंह गेला (१९०३), सूर्योदय (१९०५-०८), मध्यान्ह (१९०६-०८), सूर्यग्रहण (१९०८-०९ अपूर्ण), कालकूट (१९०९-११ अपूर्ण) आणि वज्राघात (१९१३-१५) अशा एकूण अकरा ऐतिहासिक कादंबऱ्या त्यांनी लिहिल्या. यापैकी कोणतीही कादंबरी आपण वाचली तर ती वाचीत असताना आपण प्रत्यक्ष त्या ऐतिहासिक कालातच वावरत आहोत की काय असे आपणास वाटते. कारण त्या-त्या काळातल्या ''वातावरणाशी समरस होण्याचा गुण हरिभाऊंच्या प्रतिमेने यशस्वी रीतीने आत्मसात केला होता.... 'चंद्रगुप्तां'सारखी अडीच हजार वर्षापूर्वीचा काळ दर्शविणारी कादंबरी असो किंवा वज्राघातसारखी स्मृतीशिल झालेल्या विजयनगरची कहानी असो. शिवाजीसारख्या अष्टोप्रहर कार्यमग्न राहणाऱ्या शककर्ताची जीवनस्थिती दर्शविणारी रोमहर्षक कथा असो, किंवा नाना फडणविसाच्या अपूर्ण आणि अद्वितीय मुत्सद्दीपणावर रचलेले प्रकरण असो, हरिभाऊंच्या प्रतिमेने त्या-त्या काळातील सामाजिक जीवनाचे लहान-मोठे प्रवाह जणू काय प्रत्यक्ष पाहिले.

हरिभाऊनंतर १८८५ ते १९२० या काळात मराठीतील ऐतिहासिक कादंबरीची शाखा समृद्ध करण्याचे बरेचसे श्रेय नाथमाधव म्हणजेच द्वारकानाथ माधवराव पितळे (१८८२ ते १९२८) यांचे आहे. १९०८ साली त्यांनी 'सावळ्या तांडेल' ही विशेष गाजलेली ऐतिहासिक कादंबरी लिहिली. मराठीतील ही पहिली आरमारविषयक कादंबरी. त्यानंतर नाथमाधवांनी शिवकालिन इतिहासावर एकूण सात ऐतिहासिक कादंबऱ्या लिहिल्या आहेत. 'स्वराज्याचा श्रीगणेशा', स्वराज्याची घटना, स्वराज्याची स्थापना, स्वराज्याचा कारभार, स्वराज्यावरील संकट, स्वराज्याचे परिवर्तन आणि स्वराज्यातील दुफळी अशा त्यांच्या एकूण सात कादंबऱ्याची नावे आहेत. 'स्वराज्याच्या श्रीगणेशात' इ.स.१६३९ ते १६४६ पर्यंतची हकीकत आलेली असून शिवाजीने तोरण किल्ला सर केल्याचा वृत्तांत दिलेला आहे. 'स्वराज्याच्या घटनेत इ.स.१६४६ ते १६६२ या कालखंडाचा इतिहास दिलेला असून शिवाजीने शत्रुमित्रांदिकांना आपल्या सामर्थ्याचा कसा प्रत्यय आणून दिला यासंबंधीची माहिती सांगितलेली आहे. 'स्वराज्याच्या स्थापनेत इ.स. १६६२ ते १६६४ हा काल चित्रित केलेला असून शिवाजीच्या राज्याभिषेकापर्यंतचा कथामाग या कादंबरीत आलेला आहे. 'स्वराज्याचा कारभार' या कादंबरीत इ.स. १६७४ पासून १६८० तील शिवाजीच्या निधनापर्यंतची हकीकत आली असून शिवाजीच्या राज्यपद्धतीचा परिचय करून दिलेला आहे. 'स्वराज्यावरील संबंधात' संभाजीच्या कारकीर्दीचे वर्णन आहे. राजारामाची कारकीर्द चित्रित करण्याकरिता 'स्वराज्याचे परिवर्तन' ही

कादंबरी लिहिलेली आहे. शेवटची 'स्वराज्याची दुफळी' ही कादंबरी इ.स.१७०० ते १७०७ या कालखंडावर आधारलेली असून, शाहू मोगलांच्या कैदेतून सुटून आल्यानंतर त्याचा ताराबाईशी जो कलह माजला त्याचा वृत्तांत तीत आलेला आहे. तात्पर्य हे की, या कादंबऱ्यातून नाथमाधवांनी इ.स. १६३९ पासून १७०७ पर्यंतचा मराठेशाहीचा इतिहास कादंबरी या वाङ्मय प्रकाराच्या माध्यमातून सांगण्याचा प्रयत्न केला आहे.

नाथमाधवांच्या नंतर श्री.कृष्णाजी अनंत एकबोटे उर्फ 'सहकारी कृष्ण' यांनी 'शापित महाराष्ट्र' ही ऐतिहासिक कादंबरी लिहिली. या सरससुंदर कादंबरीत संभाजीच्या वधानंतरच्या पडत्या काळातही राजा-महाराजांनी आणि त्यांच्या मराठे सरदारांनी शौर्याची परिसीमा गाठून आपल्या स्वातंत्र्यलक्ष्मीचे कसे संरक्षण केले याचे अंत:करणास चटका लावणारे चित्र रेखाटले आहे. 'राज कुंवर' याही कादंबरीत जवळ-जवळ तोच विषय मला असून संकटप्रसंगी मराठ्यांचे सौंदर्यधैर्यादी गुण कसे तेजस्वी स्वरुपात प्रकट होतात हे दाखविले आहे. सहकारी कृष्णाच्या नंतर ना. ह. आपटे यांनी 'अजिंक्यतारा' ही पहिली ऐतिहासिक कादंबरी लिहिली. औरंगजेबाच्या मृत्यूनंतर ताराबाईंनी सातारचा अजीम किंवा अजिंक्यतारा किल्ला सर केल्याच्या घटनेवर ही कादंबरी आधारलेली आहे. 'रजपुतांचा भीष्म' आणि लाच्छित चंद्रमा' या कादंबऱ्या राजस्थानच्या इतिहासासंबंधी आहेत. 'मानवी आगाराविरुद्ध दैवी इच्छा' ही चितोडसंबंधीची कादंबरी असून आपल्या पतिव्रत्य रक्षणासाठी रजपूत रमणींनी केलेल्या जोहाराचे तीत वर्णन आलेले आहे. ऐतिहासिक स्थळविपर्यासाच्या दोषाने डागाळलेली असली तरी त्यांची 'लांच्छित चंद्रमा' ही कादंबरी त्यांच्या सर्वच ऐतिहासिक कादंबऱ्यात सर्वोत्कृष्ट आहे.

'यमुना पर्यटन' आणि 'मोचनगड' या दोन्ही पायाभूत कादंबऱ्या भाषांतर युगातील कादंबऱ्या आहेत. म्हणून भाषांतर युगातील ज्ञानप्रसार, इंग्रजी विद्येचा प्रभाव, खिस्ती, धर्मप्रचार या मुख्य प्रेरणांचा व इतर काही प्रेरणांचा सविस्तर अभ्यास प्रकरण दोन मध्ये केला आहे. तसेच या कालखंडातील कादंबरी वाङ्मयाच्या स्वरुपाचाही अभ्यास केला आहे. 'यमुनापर्यटन' आणि 'मोचनगड' या कादंबऱ्यांच्या अनुशंधाने १८०० ते १८७४ या कालखंडातील ऐतिहासिक व सामाजिक कादंबऱ्याचाही अभ्यास केला आहे. तसेच 'यमुना पर्यटन' व 'मोचनगड' या दोन्ही कादंबऱ्याचे वाङ्मयीन विशेष अभ्यासण्याचाही प्रयत्न केला आहे.



SHIVAJI UNIVERSITY LIBRARY * KOLHAPUR

अशा प्रकारे मी केलेला 'यमुना पर्यटन' आणि 'मोचनगड' या कादंबऱ्याचा अभ्यास अंतिम आहे असेही म्हणता येणार नाही. मला जेवढे संदर्भ उपलब्ध झाले त्यावरून मी हा अभ्यास केला आहे. इतर अभ्यासकाला याविषयी जेवढे संदर्भ मिळतील. तेवढा हा अभ्यास वाढणारच आहे.

निखळ संशोधनाच्या भूमिकेतून व ऐतिहासिक व सामाजिक कादंबऱ्यांची उत्क्रांती व विशेष समजून घेण्यासाठी या कादंबऱ्या अभ्यासनीय वाटल्या व हा विषय निवडल्यामुळे आनंद झाला. मार्गदर्शकानांही उत्तम मार्गदर्शनाने तो सजविला. अर्थात प्रस्तुत अभ्यासाविषयीची निवड करण्यापासून ते प्रबंधिकेला पूर्णत्व प्राप्त करून देण्यापर्यंत माझे माननीय व आदरणीय मार्गदर्शक डॉ.कन्हैया कुंदप यांनी जे बहुमोल मार्गदर्शन केले. प्रबंधिका पूर्ततेसाठी प्रेरणा दिली. म्हणून त्यांचे आभार मानने हे आद्य कर्तव्य आहे.

एम्.फिल्. अभ्यासक्रमाला प्रवेश घेवून तो पूर्ण करण्यासाठी सहकार्य व प्रेरणा देणारे सन्माननीय प्राचार्य अरुण बर्गे स.गा.म.कॉलेज, कराड यांची मी ऋणी आहे. तसेच प्रा.सुमनताई पाटील, प्रा.सौ.सूर्यमाला जाधव, प्रा.बी.पी.पाटील, प्रा.सौ.शोभना रैनाक व मराठी विभाग प्रमुख देसाई सर यांचे सुयोग्य मार्गदर्शन मिळाल्याबद्दल त्याची मी आभारी आहे.

प्रबंधिकेसाठी आवश्यक अशी संदर्भ पुस्तके मिळवून देण्यासाठी 'सद्‌गुरु गाडगे महाराज कॉलेज, कराड' यांचे ग्रंथालय तसेच वेणूताई चव्हाण कॉलेजचे ग्रंथालय तसेच नगर वाचनालय त्यांचे ग्रंथपाल व त्यांच्या सहकार्याचे मी मन:पूर्वक आभार मानते.